पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

# वार्तापत्र

दिनांक: ०८/०५/२०२०

## मौजा परसलगोंदी येथील तरुणांना मिळवुन देणार मत्स्यशेतीतुन रोजगार - मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे

- **गडचिरोली पोलीस दलाचा अनोखा उपक्रम.**
- **पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी श्रमदानातुन पालटले तलावाचे रुप.**

गडचिरोली पोलीस दलातर्फे जिल्हयातील अतिदुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच नाविण्यपुर्ण योजना हाती घेतल्या जातात. उपविभाग हेडरी अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र आलदंडी हद्दीतील मौजा परसलगोंदी येथील गावतलावात वर्षानुवर्षे गाळ साठल्याचे निदर्शनास आले. या तलावाचे खोलीकरण केल्याने या भागातील पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत मिळणार होती. यामुळेच मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे साो. यांच्या आदेशान्वये आणि मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, हेडरी श्री. संकेत गोसावी यांच्या नेतृत्वात सीआरपीएफ १९१ बटा. सी कंपणीचे पोनि ठाकरे सा, प्रभारी अधिकारी पोउपनि सुदर्शन आवारी पोमके हेडरी, तसेच पोउपनि संदेश नाळे, पोउपनि अमित पाटील, पोउपनि अजित मोरे, पोउपनि विनायक माहुरकर, पोउपनि सोपान मुंढे, परि. पोउपनि महेश सातपुते, प्रभारी अधिकारी पोउपनि किरण मगदुम पोमके आलदंडी, पोउपनि गोपाल इंद्राळे, पोउपनि राहुल वानखेडे तसेच पोलीस कर्मचारी यांनी मागील काही दिवसांपासून सतत अथक परिश्रमातुन व श्रमदानातुन मौजा परसलगोंदी येथील गावतलावाचे पोकलँड, जेसीबी, ट्रॅक्टरचे साहाय्याने उपसा करुन खोलीकरण केले तसेच तलावातील मुरुम मौजा परसलगोंदी गावातील अंतर्गत रोडवर टाकुन रोड दुरुस्तीचे काम केले. तलावातील गाळ शेतकऱ्यांच्या शेतामध्ये टाकल्यामुळे शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत मिळेल.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे साो. यांच्या संकल्पनेतुन मौजा परसलगोंदी येथील तलावाचे पावसाळयापुर्वी खोलीकरण झाल्याने त्याचा लाभ पंचक्रोशीतील ग्रामस्थांना होणार आहे. त्याचबरोबर पाणी साठल्यानंतर गडचिरोली पोलीस दलातर्फे स्थानिक बांधवांना मत्स्यबीज उपलब्ध करुन दिले जातील. मत्सशेतीच्या माध्यमातुन या भागातील अनेक तरुणांना रोजगार मिळण्यास मदत मिळेल. पाणी उपलब्ध झाल्याने कृषी क्षेत्राच्या विकासाला देखील चालना मिळणार आहे. याच पध्दतीचा उपक्रम पावसाळयापुर्वी जिल्हाभरात राबविण्यात येणार असुन मत्स्यशेतीतुन अनेक बेरोजगार

तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने गडचिरोली पोलीस दल प्रयत्न करणार आहे. तलावातील गाळ उपसल्याने तलावांची पाणी साठविण्याची क्षमता वाढली जावुन अनेक शेतकऱ्यांना धान्य पिकविण्यासाठी व शेतीतून उत्पन्न वाढविण्यासाठी त्याचा लाभ होणार आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी गेली अनेक दिवसांपासुन अथक परिश्रम घेत तलावाचे खोलीकरण करण्यासाठी  श्रमदान करणाऱ्या मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, हेडरी श्री. संकेत गोसावी, प्रभारी अधिकारी पोउपनि सुदर्शन आवारी पोमके हेडरी, तसेच इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक केले आहे.



